शुक्रवार, ५ ऑगस्ट २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक १९
www.ramprahar.com

◆ पाने ८+२०=२८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

शहरांतील टोल होणार रद्द; ना. नितीन गडकरींची घोषणा/३

आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन; मान्यवरांची उपस्थिती/४

श्रीवर्धनचे माजी नगराध्यक्ष भुसाणेंच्या अडचणीत वाढ/५

## मुंबई बँकेतही ‘मविआ’ला धक्का; आज निवडणूक



**मुंबई** : राज्यातील सत्तांतरानंतर आता मुंबई बँकेतही सत्तांतर होणार असून भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांचे या बँकेच्या अध्यक्षपदी पुनरागमन होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसणार आहे. मुंबई बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाची निवडणूक शुक्रवारी (दि. ५) होणार आहे. मविआ सरकार आल्यानंतर या बँकेच्या अध्यक्षपदावरून आमदार दरेकर यांना पायउतार व्हावे लागले होते. दरम्यान, मुंबई बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवडणूकही होणार असून यामध्ये अध्यक्षपदी आमदार दरेकर यांचा विजय निश्चित मानला जात आहे. याआधी राष्ट्रवादीचे सिद्धार्थ कांबळे या बँकेचे अध्यक्ष, तर विठ्ठल भोसले उपाध्यक्ष होते. या दोघांनीही मविआ सरकार पडल्यानंतर आपापल्या पदांचा राजीनामा दिला होता.







विकासाची
दृष्टी ठेवून,
रचनात्मक काम
करणारा उत्तम
संघटक..
५ ऑगस्ट
अध्यक्ष, भाजपा
उत्तर रायगड जिल्हा
मा. श्री.
आमदार
प्रशांत ठाकूर
यांना
वाढदिवसाच्या अनंत
शुभेच्छा!
शुभेच्छुक
अनिल भगत
मा. नगरसेवक,
पनवेल महानगरपालिका


लोकप्रिय
आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
दादा, आपणांस
या जन्मदिनी दिर्घायुष्याच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. अभिजीत जाधव
श्री. सत्यवान नाईक
A. S. M. ENTERPRISES
Skyron Infra PVT. LTD.


५ ऑगस्ट
कार्यसम्राट
आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अभिष्टचिंतन शुभेच्छा....
MANOJ PATIL
CHANDAN PATIL
CHAIRMAN
H. G. PATIL
MANOJ
InfraWork Pvt. Ltd.
MANOJ
ENTERPRISES
Civil Contractor & Concrete Plant Owner
Off :- 21/22, Second floor, Near Sukham Hospital, Jasdhanwala Office Complex,
Panvel. 9870022236/02227468650. Email : manojent.2000@gmail.com


५ ऑगस्ट
सत्य | स्पष्ट | निर्भीड
अध्यक्ष, भाजपा
उत्तर रायगड जिल्हा
मा. श्री.
आमदार
प्रशांत ठाकूर
दादा, आपणांस
या जन्मदिनी दिर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
राजश्री राजाराम म्हस्कर
सरपंच, नेरे ग्रामपंचायत
राज संजय पाटील
पनवेल पंचायत समिती सदस्य
श्री. संजय पाटील
पनवेल ता. भाजपा उपाध्यक्ष


सत्य | स्पष्ट | निर्भीड
उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष, भाजपा
मा. श्री.
कार्यसम्राट आमदार
प्रशांतदादा ठाकूर
यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
५ ऑगस्ट
शुभेच्छुक
विकास ना. घरत
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका
(प्र. क्र. १३, कामोठे)
डॉ. अरुणकुमार शं. भगत
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका
(प्र. क्र. १३, कामोठे)


लोकप्रिय
आमदार
मा. श्री.
प्रशांतदादा ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अभिष्टचिंतन शुभेच्छा....
कार्यकुशल,
निर्भयी,
विनम्र
व्यक्तिमत्व...
५ ऑगस्ट
Vaibhav Thakur B.E. (Mech)
Mob. : 9930573057
Info@ompowersystem.com
Tushar Thakur D.E.E.
Mob. : 9594388899
www.ompowersystem.com
Office : 9619505152
शुभेच्छुक
वैभव ठाकूर
तुषार ठाकूर
OMS
OM POWER
SYSTEM
AN ISO 9001 : 2008 CERTIFIED COMPANY
Government Registered Contractor
Complete Solution For Your Electrical,
Fabrication & Civil Work, Fabrication Works -
Industrial Shed, Structural Fabrication, Building
Turnkey Projects Electrical Work - Industrial
Wiring, H.T./L.T., MSEDCL Power Sanctioning etc.
Office Address : 102, R. R. Residency,
Plot No - 39, Sector 19, Ulwe Node Navi Mumbai


उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष, भाजपा
कार्यसम्राट
आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
दादा, आपणांस
या जन्मदिनी दिर्घायुष्याच्या
मन:पूर्वक शुभेच्छा!
५ ऑगस्ट
शुभेच्छुक
ॲड. मनोज कृ. भुजबळ
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका
उपाध्यक्ष, भाजपा ओबीसी मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश
अध्यक्ष, पनवेल वकील संघटना
तालुकाध्यक्ष, अखिल भारतीय अधिवक्ता परिषद


नव्या दिशाने, नव्या
विचाराने, पाउल तुमचे
पुढे पडावे..!
नव्या भविष्याच्या
तेजस ज्योतीने,
तुमचे प्रगतीपथ
प्रकाशमान व्हावे..!
५ ऑगस्ट
उत्तर रायगड जिल्हा
अध्यक्ष, भाजपा
कार्यसम्राट
आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या मन:पूर्वक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
प्रवीण पाटील
माजी सभापती, स्थायी समिती
(मा. नगरसेवक, पनवेल मनपा)


कार्यसम्राट
आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
दादा, आपणांस
या जन्मदिनी दिर्घायुष्याच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
गौरव अजय कांडपिळे
सरचिटणीस,
पनवेल भाजपा युवा मोर्चा
अजय यशवंत कांडपिळे
मा. नगरसेवक पनवेल,
मा. चेअरमन पनवेल को ऑप अर्बन बँक
BHARATI AUTO CARE CENTRE
(Dealers of Hindustan Petroleum Corporation Limited)
Address: HP Petrol Pump, Survey No. 29/C, 30/0, Palidevad,
Sukapur, Panvel, Raigad, Maharashtra 410206.
Email: bhartiautocare@gmail.com | gauravkandpile@yahoo.in

शुक्रवार, ५ ऑगस्ट २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक १९
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८+२०=२८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## शहरांतील टोल होणार रद्द | केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शहरांतील टोल माफ केला जाणार असल्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी (दि. ४) राज्यसभेत बोलताना केली. यामुळे शहरांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना सांगितले की, सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने, पण एक्स्प्रेस-वेवरील टोलचा 'फादर ऑफ टोल टॅक्स' मीच आहे.



या देशात बीओटीचा सर्वांत पहिला प्रकल्प मीच आणला. महाराष्ट्रातील ठाणे-भिवंडी बायपास हा पहिला प्रकल्प होता. आता आम्ही एक नवीन पद्धत सुरू करीत आहोत, ज्यामध्ये टोलमधून शहरी भाग वगळला जाईल. त्यांच्याकडून टोल घेतला जाणार नाही.

ना. गडकरी पुढे म्हणाले, शहरांतील लोकांकडून कोणताही अधिभार घेतला जाणार नाही, कारण १० किलोमीटर रस्त्याच्या वापरासाठी त्यांना ७५ किलोमीटरचा टोल भरावा लागतो. यावर एका खासदाराने हे फार चुकीचे आहे, असे म्हटले असता ना. गडकरी यांनी हा माझा दोष नाही, तर मागील सरकारचा दोष आहे, पण आम्ही यामध्ये दुरुस्ती करू, असे सांगितले.

## पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे सभागृह उभारण्यासाठी निधी मिळावा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी



**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथे सेक्टर ११ मधील भूखंड क्र. ६ या ठिकाणी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे भव्य सभागृह उभारणीसाठी निधी देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेऊन केली आहे. या वेळी आमदार महेश बालदी, पनवेल महापालिकेच्या माजी महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर आदी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महापालिका हद्दीत शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे सभागृह उभारण्यासाठी कळंबोली से. ११ भूखंड के. ६सी/१ सामाजिक आरक्षित या भूखंडाची मागणी सिडको प्राधिकरणाकडे करण्यात आली होती. कळंबोली येथील सेक्टर ११मधील भूखंड के ६सी/१ (कम्युनिटी सेंटर) क्षेत्र १४९९.९६ चौमी या जागेत महासभा ठराव क्र. २८१ दि. २० फेब्रुवारी २०२१ला अनुसरून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर बहुउद्देशीय सभागृह उभारण्यासंदर्भात नकाशे, आराखडा तयार करण्यात आलेला असून अंदाजित आठ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. **(पान ४ वर..)**

## संजय राऊतांच्या ईडी कोठडीत वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

पत्राचाळ घोटाळाप्रकरणी शिवसेना खासदार संजय राऊत यांना न्यायालयाने पुन्हा एकदा सक्तवसुली संचालनालयाची (ईडी) कोठडी सुनावली आहे. त्यामुळे ८ ऑगस्टपर्यंत त्यांचा मुक्काम ईडी कोठडीत असेल.

दरम्यान, ईडीने संजय राऊत यांच्या पत्नी वर्षा राऊत यांनाही समन्स बजावले असून शुक्रवारी (दि. ५) चौकशीसाठी बोलाविले आहे.

### राज्यातील सत्तासंघर्षावर पुढील सुनावणी सोमवारी

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर गुरुवारी (दि. ४) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली, मात्र या वादावर न्यायालयाने कोणताही निर्णय दिलेला नसून पुढील सुनावणी ८ ऑगस्ट रोजी होणार आहे.






## संपादकीय

# धनुष्यबाण टांगणीवर

**महाराष्ट्रातील राजकारणाला वेगळेच वळण देऊ पाहणारा सर्वोच्च न्यायालयातील निवाडा आणखी लांबणीवर पडला आहे. हे सगळेच प्रकरण अतिशय गुंतागुंतीचे असल्याने ते घटनापीठाकडे सोपवावे अथवा नाही याचा निर्णय येत्या सोमवारपर्यंत घेतला जाईल तसेच पुढील निर्णय येईपर्यंत 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हाबाबत कुठलाही निर्णय निवडणूक आयोगाने घेऊ नये, अशी सूचना सरन्यायाधीशांनी केली आहे. एकंदरीत हा सारा मामला प्रदीर्घ काळ न्यायालयातच राहील असे दिसते.**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समर्थकांचा गट आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पाठिराख्यांचा उरलासुरला गट यांच्यामध्ये सर्वोच्च न्यायालयातील लढाईला तोंड फुटले आहे. या निवाड्याच्या फैसल्यावर बर्‍याच गोष्टी अवलंबून आहेत. या प्रकरणाची गुरुवारी सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांच्या खंडपीठासमोर दुसर्‍यांदा सुनावणी झाली. या प्रकरणी घटनापीठाकडे जाऊ नये अशी विनंती ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी केली असता, ते आम्ही ठरवू असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. गुरुवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी शिंदे समर्थकांच्या वतीने युक्तिवाद करताना ज्येष्ठ वकील हरीश साळवे यांनी पक्षांतर झालेच नसल्याने घटनेच्या दहाव्या परिशिष्टातील कलमांचा भंग झालाच नसल्याची भूमिका मांडली. हा युक्तिवाद मुळातूनच अभ्यासण्याजोगा आहे. विशेषत: शिंदे-फडणवीस सरकारला बेकायदेशीर ठरवणार्‍या विरोधकांनी तरी तो अभ्यासायला हवा. सर्वोच्च न्यायालयापुढे आलेले प्रकरण निव्वळ बंडखोरी अथवा उठावयाबाबतचे नाही. त्यामध्ये शिवसेनेचे अस्तित्व, कायदेमंडळाचे अधिकार, विधिमंडळ पक्षाचे महत्त्व, पक्षादेशाचा अर्थ असे अनेक मुद्दे तपासावे लागणार आहेत. किंबहुना घटनेच्या अनुषंगाने या सर्व मुद्द्यांचा नव्याने परामर्श घ्यावा लागणार आहे. सरन्यायाधीश रमणा यांनी घटनापीठ स्थापन करण्याबाबत घाई केली नाही हे योग्यच झाले. सर्व मुद्द्यांचा साकल्याने विचार करून घटनात्मक बाबींपुरतेच मुद्दे घटनापीठाकडे सोपवणे केव्हाही इष्ट ठरेल, कारण कायदेमंडळ आणि निवडणूक आयोग या दोन्ही संस्था वेगवेगळ्या आणि स्वायत्त आहेत. त्यांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे सर्व बाजूंनी विचार करता महाराष्ट्राच्या राजकारणातील हा तिढा व्यापक खंडपीठ अथवा घटनापीठाच्या मार्फतच सोडवावा लागेल यात शंका नाही. अर्थात, या प्रक्रियेला वेळ लागू शकतो, परंतु सत्ता, पक्ष आणि कार्यकर्ते या तिन्ही गोष्टी गमावलेल्या शिवसेनेतील ठाकरे समर्थक गटापाशी आता वेळच उरलेला नाही. त्यामुळेच या प्रकरणाचा ताबडतोब निकाल लावण्याची त्यांना घाई सुटली आहे. या उलट शिंदे-समर्थक शिवसेना आणि त्यांचा सत्तेतील जोडीदार भारतीय जनता पक्ष यांना मात्र कुठलीही चिंता नाही. घटनेतील तरतुदींबाबत व्यवस्थित चर्चा व्हावी व घटनेला धरूनच तोडगा निघावा एवढीच शिंदे-फडणवीस सरकारच्या समर्थकांची अपेक्षा आहे. गुरुवारच्या सुनावणीच्या वेळी काहीतरी ठोस निर्णय होऊन दिलासा मिळेल अशी ठाकरे समर्थकांची अपेक्षा होती असे दिसते, परंतु अंतिमत: ती फोलच ठरली. न्यायालयाचा निर्णय आमच्याच बाजूने लागेल असा दावा माजी मंत्री सुभाष देसाईंपासून खासदार अनिल देसाईंपर्यंत सगळेच ठाकरे समर्थक नेते करीत आहेत. तथापि, आपला दावा बळकट करण्यापूर्वी त्यांना पक्षांतर झाले आहे की नाही हे सिद्ध करावे लागणार आहे हे विसरता येणार नाही. 'धनुष्यबाण' या चिन्हाचे नेमके काय होणार हे यथावकाश कळेलच. तोवर हा तिढा सुटण्यासाठी बराच काळ गेलेला असेल अशी चिन्हे दिसतात.**



# लोकाभिमुख नेतृत्व

**लोकशाहीप्रधान आपल्या भारतात जनता लोकप्रतिनिधींची निवड करीत असते आणि निवडून आलेला नेता जनतेचे नेतृत्व करतो. नेत्याकडून सर्वसाधारणपणे जनतेच्या समस्यांची सोडवणूक आणि परिसराचा विकास अपेक्षित असतो, मात्र अनेक नेत्यांना निवडून आल्यानंतर कर्तव्याचा विसर पडतो. पनवेलचे कार्यतत्पर व सेवाव्रती आमदार प्रशांत ठाकूर त्याला अपवाद आहेत. त्यांनी अखंड जनसेवेचा वसा घेतला असून तो वृद्धिंगत होताना पहावयास मिळत आहे.**

महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वांत मोठ्या असलेल्या पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर प्रतिनिधित्व करतात. मुंबईच्या जवळ असलेल्या आणि कोकणचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणार्‍या पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. नागरिकांचा रेटा वाढत असल्याने साहजिकच व्यवस्थेवर ताण पडतो. हे लक्षात घेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणी व पाठपुराव्यामुळे पनवेल नगर परिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर झाले. या महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना विविध सोयीसुविधा देण्याचा प्रयत्न केला गेला. प्राथमिक अवस्थेतील महापालिकेची पहिली पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानंतर पालिका दुसर्‍या टर्ममध्ये प्रवेश करीत असताना राज्यात नवे सरकार सत्तेवर आले आहे. त्यामुळे आता अधिक जोमाने विकास होईल हे वेगळे सांगायला नको.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सत्ताधारी आणि देशातील सर्वांत मोठ्या भारतीय जनता पक्षाची रायगड जिल्हा अध्यक्षपदाचीही महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. त्यामुळे पनवेलसह जिल्हाभरातील लोक तसेच पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते त्यांच्याकडे विविध कामांच्या निमित्ताने येत असतात. एवढा व्याप असूनदेखील ते न थकता रात्रंदिवस कार्यरत असतात. ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. एवढी ऊर्जा ते कोठून आणतात, त्यांनाच ठाऊक. अविश्रांत परिश्रम काय असतात हे त्यांची कार्यशैली पाहिल्यावर मनोमन पटते.

आमदार प्रशांत ठाकूर हे सरळमार्गी, स्पष्टवक्ते आहेत. जे काही करायचे ते प्रामाणिकपणे आणि शिस्तीने असा त्यांचा खाक्या आहे. हेच गुण त्यांना यशस्वी करतात. गत विधानसभा निवडणुकीत राज्यातील सर्वाधिक मताधिक्याने निवडून आलेल्या पहिल्या पाच आमदारांमध्ये त्यांचा समावेश आहे. यावरून त्यांच्या उत्तुंग कार्याची आणि प्रचंड लोकप्रियतेची प्रचिती य`त`. वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची पुण्याई व भक्कम पाठबळ त्यांच्या पाठीशी जरूर आहे, पण त्यांनी स्वतःची अशी स्वतंत्र ओळख निर्माण केलीय किंबहुना ठाकूर घराण्याचा नावलौकिक व वारसा वैयक्तिक कार्यकर्तृत्वाच्या जोरावर ते समर्थपणे पुढे नेत आहेत हे आवर्जून नमूद करायला हवे.

व्यापक दृष्टिकोन आणि दूरदृष्टीने आमदार प्रशांत ठाकूर यांची वाटचाल सुरू आहे. त्यांचे कामांचे नियोजन ठरलेले असते. आपल्या पनवेल मतदारसंघातील शहरी, सिडको वसाहती आणि ग्रामीण भागातील विकासाचा मेळ ते योग्य प्रकारे घालतात. त्यांच्या आमदार निधीतून तसेच प्रयत्न व पाठपुराव्यातून शासनाच्या विविध फंडांतून मतदारसंघात सातत्याने आवश्यकतेनुसार विकासकामे सुरू असतात. जनतेप्रती इतकी बांधिलकी असलेला लोकप्रतिनिधी विरळाच.

समाजकारणाबरोबरच सांस्कृतिक, कला, क्रीडा क्षेत्रांमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांचा वावर असतो. त्यांचे आणखी एक गुणवैशिष्ट्य म्हणजे त्यांना सतत नाविन्याचा ध्यास असल्याचे दिसून येते. नवनवीन गोष्टी शिकण्यात, आत्मसात करण्यात त्यांना आनंद मिळतो. शिवाय पुस्तके वाचून ते विविध विषयांचे रसग्रहण करतात. असे हे सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व आहे.

अभ्यासू, संयमी, निगर्वी, निष्कलंक आणि लोकाभिमुख नेतृत्व असलेल्या आमदार प्रशांत ठाकूर यांची कारकीर्द उत्तरोत्तर अशीच बहरत राहो आणि त्यांना निरोगी जीवन व दीर्घायुष्य मिळो या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

**-समाधान पाटील**, वृत्तसंपादक, दै. रामप्रहर



# विनयशील अन् कर्तबगार आमदार

पनवेल विधानसभा मतदारसंघातील भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर हे विनयशील स्वभावाचे कर्तबगार आमदार आहेत. त्यांनी आमदार झाल्यावर पनवेल तालुक्यात केलेले विकासकार्य व ते लोकांशी साधत असलेला सुसंवाद यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली असून शालीन विचारांचा असा आदरयुक्त विश्वास लोकांच्या मनात झाला आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांना त्यांचे पिताश्री माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून समाजसेवेचा व राजकारणाचा वारसा लाभलाय. त्यांनी समाजसेवेला वाहून घेतले असून ते समाजाभिमुख कारभार करीत आहेत. ते करीत असलेल्या मोठ्या प्रमाणातील कार्यामुळे त्यांचा विधानसभेतील उत्कृष्ट आमदार म्हणून उल्लेख होतो. अशा कर्तव्यदक्ष आमदार प्रशांत ठाकूर याचा लोकांना अभिमान वाटतो.

आमदार प्रशांत ठाकूर हे मृदूभाषी, प्रेमळ स्वभावाचे व आपुलकीने संवाद साधणारे लोकप्रतिनिधी आहेत. ते सामान्यातील सामान्य कार्यकर्त्याची विचारपूस करून अडी-अडचणी समजून घेऊन मदत करतात. या त्यांच्या आपुलकीच्या स्वभावामुळे त्यांनी कार्यकर्त्यांचे जाळे विणले असून त्यांच्यावर कार्यकर्त्यांचा विश्वास आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा!

**-जे. एस. घरत,**
**सेवानिवृत बीडीओ**

# पनवेलमध्ये आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार चषक २०२२ रबर बॉल स्पर्धा मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात दोन दिवस आयोजित करण्यात आली आहे. या क्रिकेट स्पर्धेच्या रायगड प्रिमीअर लीगच्या संकेतस्थळाचे उद्घाटन गुरुवारी (दि. ४) भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले.

अल्पावधीतच नालौकीक मिळवलेल्या रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध अशा रायगड प्रीमअर लीगच्या तिसर्‍या पर्वाला सुरुवात होत आहे. त्या अंतर्गत भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्यसाधून आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक २०२२ या रबर बॉल क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनावेळीच रायगड प्रिमीअर लीगच्या फॉर्म रजिस्ट्रेशन व संकेतस्थळाचे भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

**मान्यवरांच्या उपस्थितीत शानदार उद्घाटन**



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

यासोबतच आमदार चषक २०० रबर बॉल या स्पर्धेचे आयोजन माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, प्रशांत कर्पे, सुमित झुंझारराव यांनी केले असून मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर ही स्पर्धा दोन दिवस सुरू राहणार आहे. या स्पर्धेतील प्रथम विजेत्याला ५० हजार रुपये सन्मानचिन्ह भव्य चषक व द्वितीय क्रमांकाच्या विजेत्याला सन्मानचिन्ह आणि भव्य चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या आणि संकेतस्थळाच्या उद्घाटनावेळी पनवेल महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, उद्योजक व मिडल क्लास सोसायटीचे अध्यक्ष राजू गुप्ते, विलास कोठारी, राकेश गायकवाड, योगेश लहाणे, उल्हास झुंझारराव, नदीम मेमर आदींसह खेळाडू उपस्थित होते.

# उलवे नोडमध्ये हेल्थकेअर क्लिनिक सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड सेक्टर २१ येथे नव्याने नुलाईफ हेल्थकेअर आणि स्कीन क्लिनिक सुरू करण्यात आले आहे. या क्लिनिकचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ४) झाले. या वेळी समाजामध्ये सहभागी होत समाजाची सेवा करायची आहे, अशी भावना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केली.

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन**



डॉ. विनायक रूपदास आणि डॉ. स्वाती सोनोन-रुपदास यांनी उलवे नोड से. २१, प्लॉट २० येथे नुलाईफ हेल्थकेअर आणि स्कीन क्लिनिक सुरू केले आहे. या वेळी भाजपचे उलवे नोड १ अध्यक्ष मदन पाटील, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, गीता ठाकूर, निकीता खारकर, युवा मोर्चाचे उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, डॉ. विलास सोनोन, धीरज ओवळेकर आदी उपस्थित होते.



**कामोठे : रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांचा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मानाचे रयतवस्त्र आणि 'रयत'चे रायगड विभागीय निरीक्षक आर. पी. ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, सीबीएसई स्कूलच्या प्राचार्य अर्चना खाडे, 'रयत'चे रायगड विभाग कार्यालय प्रमुख एस. एन. गुजर उपस्थित होते.**

पान १ वरून

## पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे सभागृह उभारण्यासाठी निधीची मागणी

या जागेवर तळ आणि दोन मजली इमारत प्रस्तावित करण्यात आलेली असून प्रस्तावित इमारतीमध्ये तळमजल्यावर पार्किंग, पहिल्या मजल्यावर बहुउद्देशीय हॉल (३७७२ चौ. फुट) असा संकल्पीय आराखडा तयार करण्यात आला आहे. सभागृह, कार्यालय, स्वच्छतागृह इत्यादी व दुसर्‍या मजल्यावर अभ्यासिका (२००० चौ. फुट) व वाचनालय (१७७१ चौ. फुट) याची तरतूद करण्यात आली असून या इमारतीचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ १७२५.४२ चौमी (१८५६५.५२ चौ. फुट) असे आहे.

या अनुषंगाने आपल्या माध्यमातून पनवेल महापालिका हद्दीतील कळंबोली येथील सेक्टर ११मधील भूखंड क्र. ६ या ठिकाणी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे भव्य सभागृह उभारणीसाठी अंदाजित आठ कोटी रुपये निधी उपलब्ध व्हावा, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणीत नमूद केले आहे.

## मालदीवच्या राष्ट्रपतींची जेएनपीए बंदराला भेट



**उरण : प्रतिनिधी**

मालदीव प्रजासत्ताकचे राष्ट्रपती महामहिम इब्राहिम मोहम्मद सोलिह यांनी गुरुवारी (दि. ४) मालदीव प्रजासत्ताकातील वरिष्ठ मान्यवरांसह जेएनपीएला भेट दिली.

या वेळी जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांनी सोलिह यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, उपायुक्त शिवराज पाटील, उपायुक्त पुरुषोत्तम कराड, उपायुक्त रुपाली अंबुरे, प्रांताधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, मुख्याधिकारी संतोष माळी आदी उपस्थित होते.

सोलिह यांना सेठी जेएनपीएमधील प्रकल्पांची माहिती दिली. या भेटीदरम्यान सोलिह यांनी बंदराच्या एकूण कामकाजाबाबतची माहिती जाणून घेत प्रत्यक्ष काम कसे चालते याचे प्रात्यक्षिकही बघितले.



**पनवेल : महापालिकेच्या प्रभाग समिती 'ब'चे माजी सभापती समीर ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, अजय बहिरा, भाजप नेते महेंद्र वावेकर, प्रसाद खंदारे उपस्थित होते.**



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांचे युवा नेते निलेश खारकर, धीरज ओवळेकर, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष योगिता भगत, किशोर पाटील आदींनी अभिनंदन केले.**

## पनवेल मनपा निवडणूक; आज आरक्षण सोडत

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आहे. राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी आणि आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर केला असून शुक्रवारी (दि. ५) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी ११ वाजता ८९ जागांसाठी आरक्षण सोडत होणार आहे.

१३ ऑगस्ट रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध होणार आहेत. पनवेल महापालिका क्षेत्रात नव्या रचनेनुसार एकूण ३० प्रभाग असून ८९ जागांसाठी आरक्षण सोडत पार पडणार आहे. या आरक्षणावर हरकती व सूचना ६ ते १२ ऑगस्टदरम्यान मागविण्यात येणार आहेत, तर १३ ऑगस्ट रोजी प्रभाग निहाय मतदार यादी जाहीर होणार आहे. २० ऑगस्ट रोजी अंतिम आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे. २ सप्टेंबर रोजी प्रभाग निहाय आणि अंतीम प्रभाग निहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# श्रीवर्धनचे माजी नगराध्यक्ष नरेंद्र भुसाणेंच्या अडचणीत वाढ

## आर्थिक अपहारप्रकरणी गुन्हा दाखल

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनमधील २५ वर्ष जुनी असलेल्या जनसेवा नागरी पतसंस्थेत चार कोटी १० लाख १७ हजार रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी श्रीवर्धनचे माजी नगराध्यक्ष पतसंस्थेचे मॅनेजर नरेंद्र भुसाणे यांच्यावर त्याचबरोबर कर्मचारी, दैनंदिन ठेव प्रतिनिधी व भुसाणे यांचे नातेवाईक अशा आठ जणांवर श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

फेब्रुवारी २०२२मध्ये झालेल्या लेखा परिक्षणात गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर जनसेवा नागरी पतसंस्थेचे ऑडिटर मकरंद दरवडे यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून बँकेचे मॅनेजर नरेंद्र भुसाणे, सचिन बाळकृष्ण कोसबे, रुपेश सुरेशचंद्र दवटे, संदेश यशवंत सावंत, चेतन अशोक गुरव, पराग परशुराम चोगले, स्वप्नील गजानन भुसाणे, सिद्धेश गजानन भुसाणे यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नरेंद्र भुसाणे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून सहकाऱ्यांच्या संगनमताने पतसंस्थेमधील सभासदांचा विश्वासघात करून बँकेत जमा होणाऱ्या रक्कमेचा अपहार केल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

---

### उरण नगरपरिषद, उरण

ता. उरण, जिल्हा-रायगड, पिन कोड-४०० ७०२

दूरध्वनी क्रमांक : २७२२२३२० Email ID : uranmunicipal@gmail.com

जा.क्र. : उनप/सा.प्र.वि./सुधा.आरक्षण सोडत/१८७३/२०२२-२०२३ दिनांक : ०४/०८/२०२२

### जाहीर नोटीस

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०२/का.६, दि. २२ जुलै २०२२ अन्वये राज्यातील ११५ नगरपरिषदा व ९ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) आरक्षण व सोडतीचा सुधारीत कार्यक्रम २०२२ जाहीर करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमातील टप्पा क्र. ७ नुसार मा. विभागीय आयुक्त यांचेकडील अंतिम मान्यतेनंतर नगरपरिषदेच्या सदस्यपदांच्या आरक्षणाची (अधिसूचना कलम १० नुसार) रहिवाशांच्या माहितीसाठी वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदांच्या वेबसाईटवर दि. ०५/०८/२०२२ (शुक्रवार)पर्यंत प्रसिद्ध करणेबाबत आदेशित केलेले आहे.

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील उपरोक्त आदेशातील कार्यक्रमानुसार मा. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, कोकण भवन यांचेकडील पत्र क्र. नपा-८/निवडणूक/रायगड/६२२, दि. ०४/०८/२०२२ अन्वये रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण या नगरपरिषदांच्या सदस्यपदांच्या आरक्षणास अंतिम मान्यता देण्यात आलेली आहे.

मा. राज्य निवडणूक आयोगाकडील उपरोक्त आदेश विचारात घेऊन मी, महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग, मला दिलेल्या अधिकारानुसार, रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण या नगरपरिषदांच्या सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्यपदाकरिताचे आरक्षण रहिवाशांच्या माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सांकेतिक स्थळावर तसेच उपरोक्त नगरपरिषदांच्या सांकेतिक स्थळावर व नोटीस बोर्डावर दि. ०५/०८/२०२२ पर्यंत प्रसिद्ध करणेत येणार आहे, असे नोटीसीद्वारे जाहीर करीत आहे.

**ठिकाण - रायगड, अलिबाग**
**दिनांक - ०४/०८/२०२२**

सही/-
**(डॉ. महेंद्र कल्याणकर)**
**जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग**

---

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

**सिडको** शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

पनवेल आणि उरण या तालुक्यांतील सिडकोने नवी मुंबई प्रकल्पाकरिता जमिनी संपादित केलेल्या आहेत. अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना महाविद्यालयीन शिक्षणाकरिता सिडको महामंडळाच्या धोरणात्मक निर्णयानुसार विद्यावेतन दिले जाते. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विद्यावेतनाचे अर्ज महाव्यवस्थापक (पुनर्वसन), सिडको लि. बेलापूर रेल्वे स्टेशन, टॉवर नं ७, सातवा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ यांच्या कार्यालयात दि. ११ ऑगस्ट, २०२२ पासून उपलब्ध असून अर्ज स्विकारण्याचा अंतिम दि. ३० नोव्हेंबर, २०२२ पर्यंत आहे.

विद्यावेतनाचा पूर्ण भरलेला अर्ज महाव्यवस्थापक (पुनर्वसन) सिडको लि., बेलापूर रेल्वे स्टेशन, टॉवर नं ७, सातवा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे सादर करावा. तसेच दि. ३० नोव्हेंबर, २०२२ नंतर प्राप्त होणाऱ्या विद्यावेतन अर्जांचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**महाव्यवस्थापक (पुनर्वसन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/१८९/२०२२-२३

---

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E–TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No: - 7000024251**<br>**Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-40/2022-2023.**<br>RFx E-tender for hiring of vehicle at 220kV Wadkhal substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.09.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 3,83,137/- EMD amount Rs. 5,000/-.** |
| 2 | Online Downloading the RFx | **04.08.2022, 17:00 Hrs. to 11.08.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 11.08.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **12.08.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN. PANVEL**

---

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### EXTENSION TO E–TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No: -7000024121**<br>**Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-37/2022-2023.**<br>Extension to RFx e-tender for Supply and replacement of 80mm & 100mm Radiator for 50MVA TF at 100kV Thal substation under EHV (O&M) Division Panvel.<br>**Tender amount Rs. 11,44,250/-, EMD amount Rs. 11,443/-.** |
| 2 | Online Downloading the RFx | **04.08.2022, 17:00 Hrs. to 11.08.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 11.08.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **12.08.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN. PANVEL**

---




### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-वारदोली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १३५/१ | ०-४७-३०<br>पो.ख. ०-०३-९०<br>**एकूण - ०-५१-२०**<br>**पैकी ०-४१-२०** | ७.०५ | **मंदा बाळाराम पाटील**<br>**कल्पेश बाळाराम पाटील**<br>**निकेश बाळाराम पाटील**<br>**हृषिका हृदयनाथ म्हात्रे**<br>**वैशाली अविनाश पाटील** |
| १३८/३ | ०-३१-६०<br>पो.ख. ०-०६-३०<br>**एकूण - ०-३७-९०** | ७.१२ | **मंदा बाळाराम पाटील**<br>**कल्पेश बाळाराम पाटील**<br>**निकेश बाळाराम पाटील**<br>**हृषिका हृदयनाथ म्हात्रे**<br>**वैशाली अविनाश पाटील** |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०३/०८/२०२२.**

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-वारदोली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १४०/१ | ०-३०-१०<br>पो.ख. ०-१०-१० | ६.११ | **दत्तात्रेय गोपाळ पाटील** |
| १४०/१ | ०-३१-००<br>पो.ख. ०-०९-०० | ६.११ | **राम गोपाळ पाटील** |
| १४०/१ | ०-१०-०० | २.०० | **राधाबाई बबन पाटील**<br>**सुनिल बबन पाटील**<br>**हर्षदा हरिश्चंद्र पवार**<br>**उज्वला विलास खेत्री**<br>**आदिती अजित माळी** |
| | **एकूण - ०-९०-२०** | | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०३/०८/२०२२.**

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१

---

### कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- kbmc123@gmail.com वेबसाईट :- http://kbmc.gov.in

संदर्भ :- कु.ब.न.प./आरोग्य/७००४/२०२२-२३ दिनांक :- ४/८/२०२२

### निविदा सूचना

कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीमध्ये खालील कामांसाठी ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यात येते आहे.

| अ.क्र. | निविदा प्रकार | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | कुबनप क्षेत्रातील मोकाट डुक्कर पकडणे. | १५००/- | ७५००/- | २ वर्ष |

निविदा फॉर्म दिनांक ०५/०८/२०२२ ते दिनांक १२/०८/२०२२ पर्यंत ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या कुबनप संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in प्राप्त होतील. निविदा फॉर्म फी व निविदा अनामत फी ऑनलाईन भरणेचे आहे. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होईल.

निविदेचे सादरीकरण दिनांक १२/०८/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online सादर करणेचे आहे.

वरील प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १७/०८/२०२२ रोजी दुपारी ४.०० वा. किंवा अन्य सोयीच्या दिवशी निश्चित होईल त्या दिवशी दालनात उपस्थित संस्थाचे प्रतिनिधी/कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव**








५ ऑगस्ट
कार्यसम्राट
आमदार
मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
भाजपा
शुभेच्छुक
कृष्णा पाटील
मा. सरपंच,
पडघे ग्रामपंचायत
भाजपा अध्यक्ष, प्रभाग क्र. २
पनवेल महानगरपालिका
रिहांश कुणाल पाटील
कुणाल कृष्णा पाटील
(युवा नेते)
सौ. कुंदा कृष्णा पाटील
मा. पंचायत समिती सदस्या




माझे कुटुंब,
माझी जबाबदारी!
आरोग्यसेवा आपल्या दारी...
"स्वच्छ सुंदर ग्रामपंचायत न्हावे"
"शौचालय बांधा घरोघरी, आरोग्य नांदेल आपल्या दारी"
मा. श्री. आमदार
प्रशांतदादा ठाकूर
यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
विकासाची दिशा व ध्यास असलेले कणखर आणि खंबीर नेतृत्व...
श्री. हरिश्चंद्र म्हात्रे
सरपंच
सौ. मंजुषा ठाकूर
उपसरपंच
श्री. किसन पाटील
ग्रामपंचायत सदस्य
श्री. सागरशेठ ठाकूर
ग्रामपंचायत सदस्य
श्री. प्रल्हाद पाटील
ग्रामपंचायत सदस्य
श्री. देवेंद्र भोईर
ग्रामपंचायत सदस्य
श्री. एन. आर. शेडगे
ग्रामविकास अधिकारी
सौ. साधना तांडेल
ग्रामपंचायत सदस्या
सौ. निर्मला ठाकूर
ग्रामपंचायत सदस्या
सौ. कल्पना घरत
ग्रामपंचायत सदस्या
सौ. अमृता पाटील
ग्रामपंचायत सदस्या
सौ. विजया ठाकूर
ग्रामपंचायत सदस्या
शुभेच्छुक : ग्रामपंचायत न्हावे, ता. पनवेल




"स्वच्छ सुंदर ग्रामपंचायत गव्हाण"
"शौचालय बांधा घरोघरी, आरोग्य नांदेल आपल्या दारी"
कार्यसम्राट
आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
यांना
वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
५ ऑगस्ट
माझे कुटुंब,
माझी जबाबदारी!
आरोग्यसेवा आपल्या दारी...
नव्या दिशाने, नव्या विचाराने, पाउल तुमचे पुढे पडावे..!
नव्या भविष्याच्या तेजस ज्योतीने, तुमचे प्रगतीपथ प्रकाशमान व्हावे..!
शुभेच्छुक
ग्रामपंचायत गव्हाण
सौ. माई प्रकाश भोईर
(सरपंच)
श्री. विजय हिरा घरत
(उपसरपंच)
श्री. विजय राठोड
(ग्रामविकास अधिकारी)
श्री. सचिन रघुनाथ घरत (सदस्य)
श्री. हेमंत कृष्णा पाटील (सदस्य)
श्री. रोशन हिरालाल म्हात्रे (सदस्य)
श्री. अरुण मधुकर कोळी (सदस्य)
श्री. पंकज पंढरीनाथ पाटील (सदस्य)
सौ. योगिता सुहास भगत (सदस्या)
सौ. शिल्पा किरण कडू (सदस्या)
सौ. उषा महेंद्र देशमुख (सदस्या)
सौ. सुनिता गजानन घरत (सदस्या)
सौ. कामिनी प्रमोद कोळी (सदस्या)
श्रीमती गिरिजाबाई जनार्दन कातकरी (सदस्या)
सुरक्षित अंतर ठेवू या, कोरोनाला हरवू या!
झाडे लावा, झाडे जगवा..!




वाढदिवस अभिष्टचिंतन
लोकप्रिय आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
५ ऑगस्ट
यांना
वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. दिलीप बाळाराम पाटील, अध्यक्ष
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका
प्रभाग क्रमांक १२, कामोठे
श्री. मंदार पनवेलकर
(प्रशासकीय अधिकारी)
कै. बाळाराम धर्मा पाटील शिक्षण संस्थेचे
सुषमा पाटील विद्यालय ज्युनिअर कॉलेज व सिनिअर नाईट कॉलेज कामोठे
(मराठी, इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यम, )
पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग
(प्लॉट नं. ३९, सेक्टर ११, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड.)
पदवीधर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आजच संपर्क करा!
९६६४०४०८२४/८४२५८८९११४
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यास केंद्र, कामोठे
एस. एन. डी. टी. महिला मुक्त विद्यापीठ, मुंबई अभ्यास केंद्र, कामोठे
B.A./ B.Com. / M.A. / M.Com.



५ ऑगस्ट
आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
कीर्ती तुमची चहूदिशांना, कर्तृत्वाने गाठलं आकाश! ध्यानी मनी एकच ध्यास पनवेलचा सर्वांगीण विकास!!
दादा, आपणांस
या जन्मदिनी दिर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
कु.सागर गणेश देशेकर
ईश्वरी आर्ट्स चिंध्रण
सौ.कमळा एकनाथ देशेकर
सरपंच - चिंध्रण ग्रामपंचायत
श्री.एकनाथ चांगो देशेकर
अध्यक्ष -रा.जि.प.ओ.बी.सी सेल
मा.सदस्य -रा.जि.प.अलिबाग




उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष,भाजपा
कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
यांना
वाढदिवसाच्या मन:पूर्वक
शुभेच्छा!
तुमचे नेतृत्व संघर्षाचे, स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे आणि जनहिताचे..!
५ ऑगस्ट
मा. कान्हाशेठ ठाकूर
प्रोप्रा. के. एच. ठाकूर
सौ. देवकाबाई कान्हाशेठ ठाकूर
अध्यक्षा, श्रमिक म. मंडळ, न्हावेखाडी, ता. पनवेल
सागर ठाकूर
सदस्य, न्हावे ग्रामपंचायत
सम्राट ठाकूर
रोशन ठाकूर
अल्केश बैकर
M/s. K. H. THAKUR
Railway & Govt. Contractor, P. Way (Track Work), Civil Work and Suppliers Of Building Material
Off. Gurukripa Apartment, Shop No. 1, Plot No. 123, Ground Floor, Opp : Telephone Exchange, Panvel - 410206. Dist. Raigad (Maharashtra)
Resi : At- Nhavekhadi, Post-Nhava, Tal. Panvel - 410206, Dist. Raigad.


विकासाची दृष्टी ठेवून, रचनात्मक काम करणारा उत्तम संघटक..
५ ऑगस्ट
उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष, भाजपा
कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
मनोहर म्हात्रे
माजी सभापती, स्थायी समिती
मा. नगरसेवक (पनवेल महानगरपालिका)
शुभेच्छुक : रत्नदीप स्पोर्ट्स क्लब, धाकटा खांदा, पनवेल


अध्यक्ष, भाजपा
उत्तर रायगड जिल्हा
मा. श्री.
आमदार
प्रशांत ठाकूर
आपणांस उदंड आयुष्याच्या हार्दिक शुभेच्छा!
शु भे च्छु क
श्री. महादेवशेठ रामचंद्र पाटील
अध्यक्ष : हनुमान मंदिर ट्रस्ट, खानावले; भाजप ज्येष्ठ नेते
सौ. सुनीता महादेवशेठ पाटील
मा. सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत खानावले
केशव पाटील
दीपक पाटील
चेतन पाटील
विकास पाटील


उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष, भाजपा
कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
दादा, आपणांस या जन्मदिनी दिर्घायुष्याच्या हार्दिक शुभेच्छा!
५ ऑगस्ट
शुभेच्छुक
सुधीर घरत
जिल्हाध्यक्ष,
भाजपा ट्रान्सपोर्ट सेल (उत्तर रायगड)
राष्ट्रीय खजिनदार,
भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ


नव्या दिशेने, नव्या विचाराने, पाउल तुमचे पुढे पडावे..!
नव्या भविष्याच्या तेजस ज्योतीने, तुमचे प्रगतीपथ प्रकाशमान व्हावे..!
उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष, भाजपा
कार्यसम्राट आमदार
मा. श्री.
प्रशांत ठाकूर
यांना वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
जितेंद्र घरत
(अध्यक्ष)
भाजपा रायगड जिल्हा कामगार आघाडी
जय भारतीय जनरल कामगार संघटना